INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
(Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal)
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.428 (SJIF 2026)

महिला हक्कांसंबंधी राज्य महिला आयोगाची भूमिका

(Role of state women commission related women right)

प्रा. आनंद वनदेव पवार

एस. एस. व्ही. पी. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय,

धुळे (महाराष्ट्र, भारत)

E-mail: anandvpawar1977@gmail.com

DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/04.2026-84286854/IRJHIS2604015

गोषवारा:

राज्य महिला आयोग ही महिलांच्या हक्कांची संरक्षण करणारी कायदेशीर संस्था आहे. आयोगाची स्थापना भारतीय संविधानातील कलम १४, १५, १६ व कलम ३८, ३९ इत्यादी निर्देश तत्वांनुसार झाली आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९९३ रोजी झाली. भारतातील राज्य महिला आयोग हे महिलांच्या हक्कांचे संरक्षण, तक्रारींची चौकशी आणि राज्य सरकारांना धोरणात्मक सल्ला देण्यासाठी स्थापन केलेले वैधानिक संस्था आहे. या आयोगांनी महिलांच्या कल्याणासाठी महत्वपूर्ण कामगिरी केली असली तरी संसाधनांची कमतरता, राजकीय हस्तक्षेप आणि अंमलबजावणीतील मर्यादा यामुळे त्यांची कार्यक्षमता कमी होते. अलीकडील संसदीय समिती अहवालानुसार,राष्ट्रीय व राज्य महिला आयोगांना अधिक स्वायत्तता व कायदेशीर बळकटी देण्याची गरज आहे. प्रस्तुत शोधनिबंधात आयोगांचे उद्दिष्ट्ये,कार्य,आव्हाने, यांचा सखोल आढावा घेतला आहे.

मूळ शब्द: *भारतीय संविधान, महिलांचे शोषण, हक्क, महिला आयोग, महाराष्ट्र*

प्रस्तावना:

भारतीय संविधानाने महिलांना कोणताही भेदभाव न करता समान हक्क दिले आहेत. मानवी हक्क कायदा हा भारतात १२ ऑक्टोंबर १९९३ पासून लागू करण्यात आलाह्या कायद्याद्वारे भारतीय संविधानात दिलेले जीवनस्वातंत्र्य, समता आणि प्रतिष्ठा यांच्याशी संबंधित हक्कांचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय व राज्य पातळीवर मानवाधिकार आयोग आणि विशेष मानवी हक्क न्यायालयांची स्थापना करण्यात आली. त्याच धर्तीवर महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना १९९२ मध्ये झाली. त्यावर आधारित प्रत्येक राज्याने स्वतंत्र महिला आयोग स्थापन केले. २५ जानेवारी १९९३ रोजी महाराष्ट्र राज्यातील महिलांच्या एकूण समस्यांच्या आणि त्यांच्या सामाजिक,आर्थिक,सांस्कृतिक स्तराचा विचार करत महिला आयोगाची

स्थापना महाराष्ट्र अधिनियम क्र. XV, 1993 अंतर्गत झाली. या आयोगाचा स्थापनेमागील उद्देश महिलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी समावेशन, समुपदेशन, सबलीकरण या तीन मुद्द्यांवर काम करावे असे ठरवले होते. समावेशन म्हणजे एखाद्या महिलेला तिचा जात, धर्म, लिंग किंवा आर्थिक स्तरावरून कुठल्याही अर्थाने शोषण किंवा भेदभावात्मक वागणूक दिली जात असेल आणि त्यामुळे ती मुख्य प्रवाहातील विविध प्रकारच्या संधी मिळविण्यापासून उपेक्षित अथवा बहिष्कृत राहत असेल तर तिला त्या सर्व संधी मिळवून देण्यासाठी आयोगाने प्रयत्न करावा उदा. एखादया स्त्रीवर बलात्कार होतो तेव्हा बलात्कारी पुरुषाला न्यायालय शिक्षा देते पण पुरुषाला शिक्षा होणे म्हणजे पिडीत स्त्रीला न्याय मिळत नसतो तर मुख्य प्रवाहामध्ये तिची स्वीकारार्थता वाढवणे हा खरा न्याय असतो. महिला आयोगाने त्यासाठी प्रयत्न करावा हे अपेक्षित आहे. स्त्रिया आणि पुरुषांमधील लिंगभावामुळे कुठल्याही पद्धतीने स्त्रियांची मानसिक खच्चीकरण होता कामा नये यासाठी त्या पद्धतीचे समाजमन तयार करण्याची गरज असते. कुठल्याही अर्थाने प्रताडित स्त्री पुन्हा समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करून घेत असताना तिचे मनोबल उंचावणे हे अति महत्वाचे आहे आणि त्यासाठी समुपदेशनाची भूमिका महिला आयोगाकडून घेतली जाणे अपेक्षित आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

१) राज्य महिला आयोगाची स्थापनेमागील भूमिका जाणून घेणे.

२) राज्य महिला आयोगाची उद्दिष्ट्य आणि कार्याचा आढावा घेणे

३) राज्य महिला आयोगासमोरील आव्हाने जाणून घेणे.

संशोधन पद्धत:

प्रस्तुत अध्ययनासाठी द्वितीय तथ्याचा आधार घेण्यात आला आहे. समस्येच्या विस्तृत आकलनासाठी संदर्भ ग्रंथ,मासिके, वर्तमानपत्रे आणि इंटरनेटचा आधार घेण्यात आला आहे.

राज्य महिला आयोगाची उद्दिष्टे:

राज्य महिला आयोगांची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत:

१) समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावण्यासाठी राज्य सरकारला सल्ला देणे

२) राज्यघटना आणि इतर कायदे अनुसार महिलांसाठी तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजना संबंधीच्या सर्व बब्बिंचे अन्वेषण व तपासणी करणे

३) त्या संरक्षक उपाययोजनांच्या अंमलबजावणीचे अहवाल दरवर्षी किवा आयोगाला वाटेल त्या वेळेस राज्य सास सदर करणे महिलांवरील अत्याचार व भेदभावाच्या तक्रारींची चौकशी करणे.

४) महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांची अंमलबजावणी तपासणे.

५) महिलांसाठी मोफत कायदेशीर मदत व समुपदेशन उपलब्ध करून देणे.

६) महिलांची स्थिती सुधारावी यासाठी राज्य सरकारांना धोरणात्मक शिफारसी करणे.

७) जनजागृती व कायदेविषयक साक्षरता कार्यक्रम राबविणे

कार्य व अधिकार:

१) राज्य महिला आयोगाला खटल्याची न्याय चौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार आहेत

२) राज्य महिला आयोगांना चौकशीसाठी कोणत्याही व्यक्तींना समन्स पाठविण्याचा अधिकार आहे.

३) कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावणे

४) राज्य महिला आयोगाला महिलांच्या कल्याणाशी संबंधित धोरणांवर सल्ला देण्याचा अधिकार आहे.

५) महिलांशी संबंधित प्रकरणामध्ये एखाद्या केंद्र अथवा राज्य सरकारी अधिकार्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करणे

६) राज्य महिला आयोग स्वयंसेवी संस्था व नागरी समाजाशी सहकार्य करतो आणि विविध प्रकरणांमध्ये हस्तक्षेप करतो.

राज्य महिला आयोगाकडून राबविलेले उपक्रम:

१) महिलांना मोफत कायदेशीर सेवा

२) महिलांशी संबंधित प्रश्नावर संशोधनास प्रोत्साहन

३) सर्व संबंधित घटकांसाठी जनजागृती मोहीम राबविली

४) महिलाविषयक बाबींवर विविध चर्चासत्र शिबिरे कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन

५) महिलांशी संबंधित कायदे विषयक साक्षरता मोहिमांचे आयोजन

६) महिला कैद्यांच्या हक्कांसाठी राज्यातील कारागृहांची तपासणी

७) बालसुधारगृहे आणि महिलांसाठीच्या संस्थांची तपासणी

८) स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने महिलांच्या जागृतीचे आणि प्रशिक्षणाचे आयोजन

आव्हाने:

१) राजकीय पुनर्वसनाचा पर्याय:

स्त्रियांचे फक्त समावेशन आणि समुपदेशन यांनी प्रश्न सुटणार नाही तर त्याबरोबर एक गरज असते तिला विविध अर्थाने पुन्हा उभे करण्याची अर्थात तिच्या सबलीकरणाची या तीनही पातळीवर महिला आयोगाने काम करावे असे वाटत असेल तर मुळात महिलांचे नेमके प्रश्न का आहेत ते शोधून ते दूर करण्यासाठी त्या महिलांवरती आवश्यक वैचारिक, भावनिक, बौद्धिक आधार गरजेचा असतो आणि या सगळ्याच बाजूंनी लढण्यासाठी निर्णय आणि अंमलबजावणीच्या पातळीवर कृतीशील नियोजनबद्ध काम करणारी व्यक्ती अपेक्षित असते परंतु दुर्दैवाने महिला आयोग म्हणजे राजकीय पुनर्वसनाचा पर्याय म्हणून बघितला जातो विशेषता महाराष्ट्राच्या महिला आयोगाचा जर आजवरचा इतिहास बघितला तर राज्यात जो पक्ष अथवा आघाडी सत्तेवर येतात महिला आयोग हा त्या सरकारच्या अख्तरित किंबहुना त्यांच्या मर्जीतील त्यांच्या पक्षातील महिला नेत्यांच्या पुनर्वसनाची सोय म्हणून त्याकडे पाहिले जाते परिणामी महिला आयोग सशक्त ,अनुभवी आणि खऱ्या अर्थाने प्रश्नांची जाण असणारे दूरदृष्टीचे नेतृत्व मिळत नाही.

२) जेव्हा एखाद्या राजकीय पक्षाच्या विचाराने प्रेरित असणारी स्त्री आयोगाची अध्यक्ष होते तेव्हा अर्थातच महिलाभिमुख धोरण राबविण्यापेक्षा पक्षभिमुख धोरण राबवण्याकडे त्यांचा कल दिसतो यावरून मग अनेक वेळा मूळ प्रश्न बाजूला जाऊन राजकीय वादळ

तयार होते .

३) स्त्रियांचे नेमके प्रश्न समजून घेणे, त्यावर संशोधन करून अहवालातून योग्य ते उपाय योजना सुचवणे आणि शासन स्तरावर त्यावर आधारित योजनाबद्ध कृती कार्यक्रम राबवण्यासाठी पाठपुरावा करणे हे महत्त्वाचे काम महिला आयोगाकडून अपेक्षित आहे. अजूनही महाराष्ट्रातील असंघठीत क्षेत्रात काम करणाऱ्या विशेषतः ऊसतोड कामगार विटभट्टी कामगार मेंढपाळ महिलांच्या प्रश्नावर म्हणावे तसे काम शासन पातळीवर झालेले नाही. अशासकीय संस्था या काम करताना दिसत असल्या तरी त्यांचे काम अनेकदा हे निवड निधी केंद्रित आहे हे जाणवते सफाई कामगार किंवा कागद काच पत्रा गोळा करणाऱ्या स्त्रिया यांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या असून की अशासकीय संस्था सध्या दिसतात परंतु या समस्यांचे समोर उच्चाटन काही केले होत नाही अशा प्रश्नावर महिला आयोगाने जाणीवपूर्वक काम केले पाहिजे सार्वजनिक ठिकाणच्या स्वच्छतागृहांमध्ये स्त्रियांसाठीची स्वच्छतागृही अत्यंत बिकट समस्या किंवा मागील तीन-चार वर्षापासून शाळकरी मुलींची वेगवेगळ्या मार्गाने होणारे शोषण किंवा किशोरवयीन मुलींची प्रश्न यावर संशोधनाच्या पातळीवर काम महिला आयोगाकडून होणे अपेक्षित आहे .

४) संसाधनांची कमतरता: निधी, कर्मचारी व पायाभूत सुविधा अपुरी.

महिला आयोग हे केवळ तक्रार निवारण करणारी संस्था नाही तर स्त्रियांसाठी आवश्यक धोरण निर्मिती करणे किंवा शासन पातळीवर अशी धोरण निर्मिती होत असताना त्यात आवश्यक ते सकारात्मक बदल सुचवणे, अनिष्ट चालीरीत्या आणि प्रथा परंपरा यामुळे जर स्त्रियांचे शोषण होत असेल तर त्यापासून स्त्रियांना स्वतःचा स्वतंत्र अवकाश जपण्यासाठी आवश्यक असणारी स्थिती निर्माण करणे ही कामे आयोगाला करावी लागतील परंतु त्यासाठी आवश्यक अधिकार आणि आवश्यक असणारी निधीची व्यवस्था महिला आयोगाला करावी लागेल.

५) प्रत्येक भौगोलिक विभागाला योग्य प्रतिनिधित्व:

महिला आयोगासाठी आवश्यक असणारी ही संपूर्ण संरचना त्यामध्ये इतर स्त्री सदस्य यांच्या जागा अजूनही रिक्त आहेत मुंबईसारख्या राजधानीचे शहरातून चालणाऱ्या आयोगाचे कामकाजही चंद्रपूर गडचिरोली गोंदिया जिल्ह्यात पोहोचले आहे महिला आयोग नावाची केंद्र नसते जिथे आपल्याला आपले प्रश्न मांडता येऊ शकतात हेच कितीकिना माहीत नाही शहरी निमशहर यांनी ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रश्नांची स्वरूप वेगळे आहे एकच चष्मा लावून या सगळ्यांची उकल करणे शक्य नाही त्यामुळे महिला आयोगामध्ये अध्यक्षांचा इतर सदस्यांच्या नियुक्ती सुद्धा संपूर्ण प्रादेशिक समतोल साधेल त्या त्या भौगोलिक विभागाला योग्य ते प्रतिनिधित्व मिळेल अशा पद्धतीने होण गरजेचे आहे

६) अंमलबजावणीतील मर्यादा: राज्य महिला आयोगाने एखाद्या प्रकरणासंबंधी केलेल्या शिफारसी बंधनकारक नसतात.

७) जागरूकतेचा अभाव: राज्यातील अनेक महिलांना राज्य महिला आयोगाच्या अस्तित्वाची माहिती नाही. आपले शोषण झाले तर कुठे दाद मागायची? त्याबाबत कोणती यंत्रणा आहे. तिची कार्यपद्धती कशी आहे याबाबत आजही ग्रामीण आणि आदिवासी भागातील स्त्रियांना माहिती नाही.

८) आयोगावर नियुक्त करतांना स्त्रियांना स्त्रीविषयक कायदे आणि प्रश्न हाताळण्याची हातोटी, संवाद कौशल्य यांचे ज्ञान असलेल्या

महिलांची नियुक्ती केली पाहिजे

शिफारशी :

१) राज्य महिला आयोगांना अधिक स्वायत्तता व अंमलबजावणीचे अधिकार देणे.

२) राज्य महिला आयोगात निष्पक्ष नियुक्त्या सुनिश्चित करणे.

३) ग्रामीण आणि आदिवासी भागातील स्त्रियांमध्ये आयोगाच्या कार्यपद्धतीविषयीं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहकाऱ्याने जनजागृती वाढविणे.

४) महिलांच्या तक्रार निवारणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे.

५) राज्य महिला आयोगाच्या शिफारसींना कायदेशीर बळकटी देणे.

निष्कर्ष:

राज्य महिला आयोग हे महिलांच्या हक्कांचे रक्षण करणारे महत्वाची विधायक संस्था आहे. या आयोगाने आतापर्यंत कायदेशीर मदत, जनजागृती व धोरणात्मक सल्ला यात महत्वपूर्ण योगदान दिलेले दिसून येते. मात्र, राजकीय हस्तक्षेप, संसाधनांच्या कमतरता, अंमलबजावणीतील मर्यादा जागरूकतेचा अभाव यामुळे आयोगाला तत्परतेने व निष्पक्षपातीपणे काम करता येत नाही. शासनाने आयोगाला सशक्त बनविण्यासाठी योग्य सुधारणा केल्यास हा आयोग महिलांच्या हक्काचे संरक्षण करून महिला सक्षमीकरणासाठी अधिक प्रभावी ठरू शकतो.

संदर्भ सूची:

१) Centre for Women's Development Studies. (2021). National Commission for Women: Assessing Performance. New Delhi. Constitution of India. New Delhi.

३) Government of Maharashtra.(1993). Maharashtra State Commission for Women Act, XV of 1993.Mumbai.

४) National Commission for Women. (1992). Annual Report. New Delhi.

५) PRS Legislative Research. (2023). Report on Functioning of National and State Women Commissions.

६) तो सुदिन समजावा,सुषमा अंधारे, लोकसत्ता २८ फेब्रुवारी २०२६

७) महिलांचे हक्क व अधिकार, ३ मार्च २००१,महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र शासन पान नं - ७